हिरड्यांच्या आरोग्याची काळजी महत्त्वाची!

आरोग्यवार्ता

नवी दिल्ली : मौखिक आरोग्याची नियमित काळजी घेणे नितांत गरजेचे असते. मात्र, बहुसंख्य लोक ते गांभीर्याने घेत नाहीत. दात व हिरड्यांचे आरोग्य आपल्या एकूण आरोग्याशी संबंधित असते. दंतवैद्यक तज्ज्ञांच्या मते एखाद्याचे सर्व दात किडलेले नसले, तरी दाताभोवतींच्या हिरड्यांचे आरोग्य नीट नसेल तर त्यांचे विकार होऊन दातांना धोका पोहोचू शकतो.

हिरड्या लाल होणे, त्यांना सूज येऊन दुखणे इथपासून त्यांच्या गंभीर विकारात पेशींचा नाश होऊन दातांचा आधार असलेल्या जबड्याच्या हाडालाही इजा पोहोचते. परिणामी दात पडतात. 'जिंजिव्हिटिस' या हिरड्यांच्या प्राथमिक विकारात हिरड्यांतून रक्त येणे, दाताखालील भागांत त्या लाल होऊन सुजणे असा त्रास होतो. वेळीच लक्ष न दिल्यास 'पेरिओडॉंटिटिस' हा हिरड्यांचा गंभीर विकार होऊ शकतो. त्यात हिरड्यांच्या मऊ उतींचा (सॉफ्ट टिश्यू) नाश होऊन दातांचा पाया नष्ट न झाल्याने पडतात. हिरड्यांच्या समस्यांची लक्षणे वेळीच लक्षात आल्यास संभाव्य विकारांवर मात करता येते. ती लक्षणे पुढीलप्रमाणे :

हिरड्यांचा रंग बदलणे : हिरड्यांचा नेहमीचा गुलाबी रंग बदलून त्या पांढऱ्या, गडद लाल किंवा काळसर दिसू लागल्यास त्यांच्या विकाराची सुरुवात असू शकते.

हिरड्या ठसठसणे : खाताना किंवा खाद्यपदार्थांच्या संपर्कात आल्यानंतर हिरड्यांमध्ये तीव्र वेदना, ठसठस होत असल्यास त्यांच्या विकाराचा मोठा संभव असतो.

हिरड्यांतून रक्त येणे : बोटांच्या अलगद स्पर्शानंतर किंवा दातांचा ब्रश लावल्यानंतर हिरड्यांत वेदना होऊन रक्तस्राव होत असेल तर हिरड्यांच्या विकाराची शक्यता असते. तज्ज्ञांच्या मते हिरड्या दातांचा आधार असतात. दातांच्या मुळांना दंतकिडीपासून दूर ठेवतात. त्यामुळे त्यांची नियमित काळजी घेणं नितांत गरजेचं असतं. त्यांनी त्यासाठी करायचे सोपे उपाय सांगितले. त्यांच्या सल्ल्यानुसार आपले दात दिवसातून किमान दोनदा घासावेत. त्यामुळे दंतकीड, दात सळसळणे आणि त्यावर किटण चढणे रोखता येते. दोन-तीन मिनिटे दात घासावेत. दातांच्या प्रत्येक भागात ३० सेकंदापर्यंत ब्रश करावे. प्रत्येक दात स्वच्छ करावा. तज्ज्ञांच्या सल्ल्याने योग्य टूथपेस्ट निवडावी. चांगल्या 'माऊथवॉश'ने नियमित मुखशुद्धी करावी. 'माऊथवॉश'दातांच्या प्रत्येक भागात पोहोचतात. हिरड्यांच्या मृदू उतींपर्यंत पोहोचून हा भाग त्याने निर्जंतुक होतो. पुदिना, कडुनिंब, डाळिंब, मेस्वाक किंवा पुदिनायुक्त 'माऊथवॉश' निवडावा. हिरड्या व दातांच्या आरोग्यासाठी त्यांचा चांगला उपयोग होतो. हिरड्यांचा नियमित हळुवारपणे मसाज करावा. त्यामुळे त्यांचे आरोग्य चांगले राहते. त्यासाठी पूरक औषधांचा वापर करता येतो. औषधी तेलाने तोंडावाटे खळखळून चुळा भरल्याने हिरड्यांचे आरोग्य चांगले राहते. किटणही चढत नाही. धूम्रपानापासून दूर रहा. फळे, भाजीपाला, धान्यांचा संतुलित व पौष्टिक आहार घ्यावा. दंतवैद्याकडून वर्षभरातून एकदा तपासणी करून घ्यावी.

300% MORE OXYGEN
Manikchand
Oxyrich

शारंगधर® आपल्याला देते QSE प्रॉमिस

Quality (गुणवत्ता)
- ✓ प्रत्येक वनस्पतीची व अंतिम उत्पादनाची अत्याधुनिक प्रयोगशाळेत चाचणी.
- ✓ Sharangdhar Ayurvedic Clinical Research Center
- ✓ GMP व ISO-9001:2015 प्रमाणित कंपनी.
- ✓ औषधी वनस्पतींची स्वत:ची लागवड.
- ✓ अत्याधुनिक मशिनद्वारे स्वच्छतेचे काटेकोर पालन करून बनविलेली उत्पादने.

Safety (सुरक्षितता)
- ✓ Heavy Metal व Steroid विरहित उत्पादने.
- ✓ रासायनिक प्रक्रिया विरहित उत्पादन पद्धती.
- ✓ 100% Natural, No Side Effects
- ✓ गेल्या ३० वर्षांपासून प्रत्येक उत्पादनावर Expiry Date घालणारी एकमेव कंपनी.
- ✓ गोळ्यांच्या स्वरूपात असल्यामुळे योग्य तेवढ्याच मात्रेत औषधांचे सेवन.

Efficacy (हमखास रिझल्ट)
- ✓ औषधे आवरण विरहित (Uncoated) असल्यामुळे टॅब्लेटस् जिभेवर ठेवताच परिणाम होण्यास सुरूवात होते.
- ✓ औषधी वनस्पतींवर कोणतेही रासायनिक फेरफार न करता मुळ स्वरूपात वापरत असल्याने त्यातील सर्व कार्यकारी घटक (All Active Ingredients) शरीराला मिळतात आणि त्यामुळेच शारंगधरची औषधे अधिक परिणामकारक ठरतात.
- ✓ रोगाचा समूळ नाश करणारी शारंगधरची संपूर्ण उपचार पध्दती.

Customer Care - 92255 15525

'इम्पिरिकल डेटा'साठी राज्य सरकारचे असहकार्य

मागासवर्ग आयोगाचे सदस्य न्या. चंद्रलाल मेश्राम यांचा आरोप

राजेश्वर ठाकरे, लोकसत्ता

अहवाल सादर करण्यासाठी १२ जूनपर्यंत मुदत

२९ जून २०२० च्या अधिसूचनेनुसार, सर्वेक्षणाचे काम राज्य मागास आयोगाला देण्यात आले होते. ते काम मागासवर्ग आयोगाकडून काढून समर्पित ओबीसी आयोगाला देण्यात आले. हा आयोग निवृत्त प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आला आहे. या आयोगाने मागच्या दीड महिन्यापासून नागरिकांकडून सूचना मागवल्या. सूचना देण्याची मुदत ५ मे २०२२ पर्यंत होती. ती वाढवून ३१ मे करण्यात येत आहे. विभागीय स्तरावर बैठका सुरू आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या १० मे २०२२ च्या आदेशानुसार १२ जून २०२२ पूर्वी अहवाल देऊन अधिसूचना काढावी लागणार आहे.

नागपूर : राज्य सरकारने राज्य मागासवर्ग आयोगाला इतर मागासवर्गीयांच्या (ओबीसी) राजकीय मागासलेपणाची माहिती (इम्पिरिकल डेटा) गोळा करण्याची संधी दिली नाही. राज्य सरकारने त्यांच्याकडे उपलब्ध सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक मागासलेपणाची माहिती केवळ आयोगाकडून अधिसूचित करवून घेतली. म्हणून हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात टिकले नाही. तसेच मध्य प्रदेशच्या मागासवर्ग आयोगाने जो 'इम्पिरिकल डेटा' गोळा केला आणि त्याला कोणीही सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले नाही. महाराष्ट्राबाबत तशी स्थिती नाही, येथे ओबीसी आरक्षणविरोधी अनेक जण सक्रिय आहेत, असे मत राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य, निवृत्त न्यायाधीश चंद्रलाल मेश्राम यांनी व्यक्त केले.

राज्य सरकारने आयोगाकडे अंतिरम अहवाल मागितला होता. आयोगाकडे तशी माहिती नसल्याने तो देण्यास नकार दर्शवला. राज्य सरकारने आमच्याकडे याबाबत माहिती असल्याचे सर्वोच्च न्यायालयाला सांगितले.

न्यायालयाने ती माहिती आयोगाकडून तपासून घेण्याचे निर्देश दिले. राज्य सरकारने आम्हाला दिलेल्या आकडेवारीत राजकीय मागासलेपणाचा एकही आकडा नव्हता.

त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारचा अंतरिम अहवाल फेटाळला. त्याचे खापर सरकारने राज्य मागासवर्ग आयोगावर फोडले. त्यानंतर समर्पित आयोग स्थापन केले. राज्य सरकारने राजकीय मागासलेपणाची माहिती आयोगाला गोळा करूच दिली नाही. त्यासाठी आवश्यक पैसा दिला नाही आणि यंत्रणाही दिली नाही.

आयोगाने ४३५ कोटींचा दिलेला प्रस्ताव प्रलंबित ठेवला. उलट आयोग पैसे मागतो म्हणून बदनामीचे सत्र सुरू केले. मात्र ती रक्कम शासकीय यंत्रणेवर खर्च होणार होती, याकडेही मेश्राम यांनी लक्ष वेधले.

किसान क्रेडिट कार्ड खातेदारांची संख्या वाढली

परतफेडीअभावी राज्यात थकबाकी फुगली

लोकसत्ता प्रतिनिधी

> **शेतकऱ्यांसाठी किसान क्रेडिट कार्ड योजना चांगली आहे, पण त्यात काही बदल आवश्यक आहेत. स्वामिनाथन आयोगाने त्यांच्या अहवालात कर्ज परतफेडीची कालमर्यादा तीन ते पाच वर्षे करावी, अशी शिफारस केली आहे. ती लागू करावी. कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांचे पीक बुडाले तर एका वर्षात त्याला कर्जाची परतफेड करणे अवघड होते. त्यामुळे थकबाकीदार ठरतो. परिणामी, पुढच्या वर्षी बँक त्याला कर्ज देत नाही. त्यामुळे त्याला पुन्हा सावकाराकडे जाण्याशिवाय पर्याय उरत नाही.**
> **-विजय जावंधिया,** कृषी अभ्यासक, नागपूर

नागपूर : राज्यात किसान क्रेडिट कार्ड वापरणाऱ्या शेतकऱ्यांच्या संख्येत २०१८-२०२१ या काळात लक्षणीय वाढ दिसून येत आहे. दुसरीकडे कर्जाची वेळेत परतफेड होत नसल्याने एकूण थकबाकीची रक्कम कमी होताना दिसत नाही.

केंद्र सरकारकडून प्राप्त माहितीनुसार महाराष्ट्रात २०१९ मध्ये कार्डधारक खातेदारांची संख्या ५७ लाख ७४ लाखांवर होती. २०२१ मध्ये ही संख्या ६८.६७ लाखांवर गेली. वरील तीन वर्षांच्या काळात खातेदारांकडील थकबाकीची रक्कमही लक्ष वेधून घेणारी आहे. २०१९ मध्ये ही रक्कम ५५,६०४ कोटी, २०२१ मध्ये ५५,६३५ कोटी होती. कर्जाची वेळेत परतफेड न करणे व त्यामुळे पुढच्या वर्षी कर्जासाठी अपात्र ठरणे ही थकबाकीमागची कारणे असल्याचे कृषी जाणकार सांगतात.

शेतकऱ्यांना कृषी हंगामाच्या काळात रोकड उपलब्ध व्हावी म्हणून बँकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्ड देण्याची योजना सुरू करण्यात आली. शेतकऱ्यांकडे असलेली शेती व तो घेत असलेले पीक या आधारावर त्याची कर्ज मर्यादा ठरवली जाते. पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात तेवढी रक्कम जमा होते. एक वर्षाने त्याला त्याची परतफेड करायची असते. शेतकऱ्यांना सावकाराकडे जावे लागू नये हा ही योजना सुरू करण्यामागचा हेतू आहे.

एस.टी.चे आणखी तीन अधिकारी निलंबित

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर: संपात सहभागी काही एस.टी. कर्मचाऱ्यांना त्यांच्या संपपूर्व काळातील शिल्लक रजा रोखीकरणाचे पैसे देण्याच्या प्रकरणात शुक्रवारी आणखी तीन अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. याच प्रकरणात नागपूर विभाग नियंत्रक नीलेश बेलसरे निलंबित करण्यात आले होते.

निलंबित अधिकाऱ्यांमध्ये विभागीय अधिकारी शैलेश भारती, आस्थापना पर्यवेक्षक सुभाष वंजारी आणि उल्हास घुई यांचा समावेश आहे.

या प्रकरणात यापूर्वी अकोला विभाग नियंत्रकांसह तेथील पाच अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती. या प्रकरणात आणखी काही अधिकारी निलंबित होतील,असा अंदाज 'लोकसत्त'ने वर्तवला होता. तो आता खरा ठरला आहे.

नवज्योतसिंग सिद्धू तुरुंगात

एक्स्प्रेस वृत्त, चंडीगड

काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नवज्योतसिंग सिद्धू शनिवारी पतियाळा न्यायालयाला शरण गेले. त्यांची कारागृहात रवानगी करण्यात आली. त्यांना १९८८ ला रस्त्यावर झालेल्या वाद-हाणामारीप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने एक वर्षाच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. गुरुनाम सिंग या ६५ वर्षीय व्यक्तीचा सिद्धूंशी झालेल्या हाणामारीत मृत्यू झाला होता.

सिद्धू याच्या वकिलांनी सर्वोच्च न्यायालयाकडे सिद्धू यांच्यासाठी आठवडाभराची मुदत मागितली होती. मात्र, ती मंजूर न झाल्याने सिद्धू शरण आले. शुक्रवारी संध्याकाळी पाचच्या सुमारास पतियाळातील माता कौशल्या रुग्णालयात वैद्यकीय तपासणीनंतर त्यांची कारागृहात रवानगी करण्यात आली. सिद्धू यांना पतियाळा मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात येणार आहेत. तेथे त्यांचे कट्टर राजकीय प्रतिस्पर्धी बिक्रमसिंग मजिठिया हे अमली पदार्थप्रकरणी कारावास भोगत आहेत. आपल्या निवासाजवळ असलेल्या पतियाळा जिल्हा न्यायालयात सिद्धू शुक्रवारी नवतेजसिंग चिमा व काही पक्षनेत्यांसह पोहोचले. शुक्रवारी सकाळी सिद्धू यांच्या निवासस्थानी त्यांचे काही समर्थक जमा झाले होते.

पुणे मेट्रो प्रकल्पाचे सल्लागार शशिकांत लिमये यांचे निधन

लोकसत्ता प्रतिनिधी



पुणे : मेट्रो प्रकल्पासाठी आग्रही भूमिका मांडणारे आणि पुणे, पिंपरी चिंचवडमधील मेट्रो प्रकल्पाचे सल्लागार शशिकांत लिमये (वय ७१) यांचे गुरुवारी रात्री निधन झाले. भारतीय रेल्वेतील तज्ज्ञ अधिकारी म्हणूनही त्यांची ख्याती होती. लिमये यांच्यामागे पत्नी, दोन मुली आणि भाऊ असा परिवार आहे.

लिमये यांना गुरुवारी रात्री आठच्या सुमारास घरी हृदयविकाराचा झटका आला. त्यांना खासगी रुग्णालयात नेण्यात आले, परंतु उपचारापूर्वीच त्यांचे निधन झाले. मेट्रो प्रकल्पाच्या विस्तारी करणाबाबत दोन दिवसांपूर्वी महामेट्रोने घेतलेल्या बैठकीतही त्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. महाराष्ट्रातील डोंगराळ भागात रेल्वे मार्गांचे विस्तारीकरण कसे करता येईल, तसेच पुण्याभोवती लोहमार्गाचे विस्तारीकरण कसे असावे, याबाबतही आराखडे त्यांनी तयार केले होते. लिमये यांचे शिक्षण पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग, फर्ग्युसन महाविद्यालय आणि शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात झाले होते. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे ते सुवर्ण पदकविजेते विद्यार्थी होते. त्यानंतर मुंबई आयआयटीमधून त्यांनी अभियांत्रिकीची पदवी घेतली. स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून ते भारतीय रेल्वेत दाखल झाले. रेल्वेत विविध ठिकाणी जबाबदारी पार पाडल्यानंतर विभागीय व्यवस्थापक या पदावरून निवृत्त झाले.

लालूप्रसाद यांच्याविरोधात आणखी एक गुन्हा

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

केंद्रीय अन्वेषण विभागाने माजी केंद्रीय मंत्री तसेच बिहारचे माजी मुख्यमंत्री लालूप्रसाद यादव यांच्याविरोधात भ्रष्टाचाराच्या नव्या प्रकरणात शुक्रवारी गुन्हा दाखल केला. नोकऱ्या देण्याच्या बदल्यात जमीन घेण्यात आल्याचे हे प्रकरण असून त्या काळात लालूप्रसाद यादव हे संयुक्त पुरोगामी आघाडी (यूपीए) सरकारमध्ये रेल्वेमंत्री होते, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

महाराष्ट्र जनुककोशाबाबत शासन निर्णय लवकरच

(पान ३ वरून) ऑगस्ट २०२१ मध्ये मुख्यमंत्र्यांना हा अहवाल सादर करण्यात आला होता. महाराष्ट्र जनुककोश प्रकल्पात जे सात घटक निश्चित करण्यात आले आहेत, त्यांना पूरक अशा माहिती व्यवस्थापनाकरिता भक्कम व्यासपीठ निर्माण करण्यात येईल. यशस्वी संवर्धनविषयक पद्धतींबाबत माहितीचे संकलन व विश्लेषण करून प्रमाणीकरण करणे, विविध स्तरांवर शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात तसेच धोरणात्मकदृष्ट्या यशस्वी संवर्धनविषयक पद्धतींचा प्रसार करणे, शाश्वत जैवविविधता संवर्धन करणे तसेच वातावरण बदलामुळे अन्नसुरक्षेवर होणाऱ्या परिणामांवर उपाययोजना करणे हे समाविष्ट आहे.

बीएआरसी हॉस्पिटल

अणुशक्तीनगर, मुंबई-९४

वॉक-इन-इंटरव्ह्यू

नियमित रिक्त पदांच्या अनुसार **२७ मे, २०२२** रोजी स्थानापन्न तत्त्वावर **हॉस्पिटल ॲडमिनिस्ट्रेटर पोस्ट**करिता बीएआरसी हॉस्पिटल येथे "वॉक-इन-इंटरव्ह्यू"चे आयोजन केले जाणार आहे :

वेळ : स. १०:३० ते दु. ०४:००

तपशिलाकरिता कृपया www.barc.gov.in या बीएआरसीच्या वेबसाइटला भेट द्यावी.

MALU PAPER MILLS LTD

Registered Office: Heera Plaza, 4th Floor,
Near Telephone Exchange, Central Avenue, Nagpur.
Ph: 91-712- 2760308 Fax: 91-712-2760310, Email: contacts@malupaper.com
Website: www.malupaper.com, CIN: L15142MH1994PLC076009

NOTICE

NOTICE is hereby given that "1/2022-23" meeting of the Board of Directors of the Company is scheduled to be held on **Saturday the 28th day of May 2022** at **03.30 PM** at the Registered Office of the Company at Heera Plaza, 4th Floor, Near Telephone Exchange, Central Avenue, Nagpur – 440008 with a facility of video conferencing inter alia, to transact the following business:

1. To consider, approve and take on record the Audited financial results of the Company for the quarter and year ended on March 31, 2022 along with the statement of assets and liabilities as on March 31, 2022 and cash flow statements for the year ended on 31st March 2022 and to take on record the Auditor's report thereon.
2. Any other business with the permission of Chairman.

The notice is also available on website of the Company **http://www.malupaper.com** and that on the website of BSE **https://www.bseindia.com/** and NSE **https://www1.nseindia.com.**

Date: 20/05/2022
Place: Nagpur

By order of the Board, SD/-
Mayuri Asawa
Company Secretary & Compliance office (M. No- A50891)

पंजाब नैशनल बैंक
punjab national bank

मंडळ कार्यालय – नाशिक वूडलॅंड टॉवर, गंगापूर रोड, नाशिक ४२२००५
दूर क्र. ०२५३-२३१६२१२ **ई-मेल आयडी:** conashikgad@pnb.co.in

एटीएमसाठी आवश्यक जागा

पंजाब नॅशनल बँक ०१ एटीएम आउटलेटसाठी प्रस्ताव मागवित आहे. खालील ठिकाणी प्रत्येकी ०१ जागा संमती असलेल्या व्यावसायिक संकुल किंवा व्यावसायिक वापरासाठी संबंधित सरकारी प्राधिकरणाच्या द्वारे विहित अटींच्या आधारे निश्चित करण्यात आलेल्या इमारतीमध्ये असावे.

क्र.	ठिकाण	ठिकाणासाठी प्राधान्य	अंदाजे चटई क्षेत्र
१	**अकोला**	**टिळक रोड,** नेकलेस रोड किंवा गोरक्षण रोड, अकोला	८०±२०% चौ.फू. प्राधान्याने तळ मजल्यावर

पुरेशा पार्किंगसह (निःशुल्क) सुयोग्य जागा असलेल्या संस्थांनी उपरोक्त नमूद करण्यात आलेले चटई क्षेत्रफळ आणि जागेसह बँकेच्या डिझाईन आणि स्पष्टीकरणाच्या अनुसार बांधकाम फेरफार करण्यास इच्छुक असलेल्या पक्षकार त्यांचे प्रस्ताव दोन भागांमध्ये म्हणजेच तांत्रिक आणि वित्तिय बोली मागवित आहे. दोन्ही सदर बोली (तांत्रिक आणि व्यावसायिक असे चिन्हांकित केलेले) वेगवेगळ्या लिफाफ्यामध्ये मोहरबंद करावे आणि नंतर एका मोठ्या लिफाफ्यामध्ये त्यावर **टिळक रोड, नेकलेस रोड एटीएम जागेसाठी प्रस्ताव** किंवा **गोरक्षण रोड, अकोला एटीएम जागेसाठी प्रस्ताव** असे ठळकपणे लिहून **पंजाब नॅशनल बँक मंडळ कार्यालय – नाशिक, वूडलॅंड टॉवर, गंगापूर रोड, नाशिक – ४२२००५ ह्यांच्याकडे ०६ जुन २०२२** पर्यंत किंवा त्यापूर्वी पाठवावे.
बोली कामकाजाच्या सर्व दिवसांमध्ये (२रा आणि ४था शनिवार वगळता) स. १० वा. ते सायं. ५ वा. पर्यंत स्विकारण्यात येतील. तांत्रिक आणि वित्तिय बोलींसाठी नमुना उपरोक्त नमूद पत्त्यावरून प्राप्त करता येईल किंवा **www.pnbindia.in** वरून डाऊनलोड करता येईल.
कोणतेही कारण न देता कोणताही/सर्व प्रस्ताव नाकारण्याचे अधिकार बँक राखून ठेवत आहे.

सही/-
मंडळ प्रमुख

---

kotak

कोटक महिंद्रा बँक लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय : 27 बीकेसी, सी 27, जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू), मुंबई - 400 051.
कॉर्पोरेट आयडेंटिटी नं. L65110MH1985PLC038137).**क्षेत्रिय कार्यालय :** 8, डब्ल्यु हाय कोर्ट रोड, शंकर नगर, धरमपेठ, नागपूर, महाराष्ट्र 440010

लिलाव विक्रीसाठी जाहीर सूचना

कृपया ही नवीन सूचना समजण्यात यावी ज्याद्वारे कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की कोटक महिंद्रा बँक लि. च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या सांकेतिक ताब्यात असलेल्या खाली नमूद अचल मालमत्तेची "जशी आहे जेथे आहे", "जशी आहे जे काही आहे" आणि "तेथे जे काही आहे" तत्त्वावर विक्री करण्यात येणार असून खालील तपशिलानुसार अचल मालमत्तेच्या आमचे ई-लिलाव सेवा पुरवठादार म्हणजे मे. सी१ इंडिया प्रा.लि. च्या वेब पोर्टलच्या माध्यमातून प्रस्ताव आमंत्रित आहेत:-

कर्ज खाते क्र. LAP18179265, LAP18179278, LAP18222917, LAP18172842, LAP18222920

कर्जदार/जमानतदार/गहाणदाराचे नाव : १. मेसर्स मेन्स क्लब एनएक्स (कर्जदार), २. मेसर्स निल फॅशन (कर्जदार), ३. श्रीमती. श्रीमती दयाबाई हरेशकुमार बजाज (सह–कर्जदार), ४. श्री. हरेशकुमार होलाराम बजाज (सह–कर्जदार), ५. श्री. दिपक हरेशकुमार बजाज (सह–कर्जदार), ६. श्री. कमाल हरेशभाई बजाज (सह–कर्जदार)

१३(२) मागणी सूचनेची तपशील : १. मेसर्स मेन्स क्लब एनएक्स (कर्जदार) मागणी सूचना दिनांक १३(२) सूचना दिनांक : १७.०९.२०२१; मागणी सूचना रक्कम (१३(२) सूचना रक्कम : रु. १,०१,१८,७०५.१८/– (रुपये एक कोटी एक लक्ष अठरा हजार सातशे पाच आणि अठरा पैसे) ३०.०८.२०२१ पर्यंत.

२. मेसर्स निल फूशन (कर्जदार) मागणी सूचना दिनांक (१३(२) सूचना दिनांक) : १७.०९.२०२१; मागणी सूचना रक्कम (१३(२) सूचना रक्कम : रु. ४३,२५,२३९.२५/– (रुपये चार लक्ष पंचवीस हजार दोनशे एकोणचाळीस आणि पंचवीस पैसे) ३०.०८.२०२१ पर्यंत.

संपत्ती क्र.	संपत्तीचे विवरण	राखीव किंमत	इसारा अनामत रक्कम	अचल संपत्तीकरीता निरीक्षण दिनांक	लिलावाची दिनांक /वेळ
संपत्ती नं. १	प्लॉट नं. १९ आणि २०, जुना सर्वे नं. ३/३, नविन सर्वे नं. ८१ मौजा राजापेठ, प्रगाने बडनेरा, अमरावती – ४४४६०१	रु. ८१,७३,९५०/– (रुपये एक्याऐंशी लक्ष त्र्याहत्तर हजार नऊशे पन्नास फक्त)	रु. ८,१७,३९५/– (रुपये आठ लक्ष सतरा हजार तीनशे पंच्याण्णव फक्त)	२१.०६.२०२२ पासून स. ११ ते दुपारी १२ वाजता	२९.०६.२०२२ पासून स. २ ते दुपारी ३ वाजता
संपत्ती नं. २	शॉप नं. ए४ ००२ फिल्ड गट नं. १४४ए १४२ए १३९ए १४०ए १३८ए ८८ए १३३ए १३४ए १३५ए ११९ए ८७, मौजा बोरगाव प्र. नांदगाव पेठ, ता. आणि जि. अमरावती ४४४६०६.	रु. १,६९,५७,६००/– (रुपये एक कोटी एकोणसत्तर लक्ष सत्तावन हजार सहाशे फक्त)	रु. १६,९५,७६०/– (रुपये सोळा लक्ष पंच्याण्णव हजार सातशे साठ फक्त)	२२.०६.२०२२ पासून स. ११ ते दुपारी १२ वाजता	२९.०६.२०२२ पासून स. २ ते दुपारी ३ वाजता

प्रस्ताव/ईएमडी सबमिट करण्याची शेवटची तारीख : २८.०६.२०२२ ला. सायंकाळी ५.०० पर्यंत. बाढीव रक्कम : रु. १,००,०००/– (रुपये लक्ष फक्त)

विक्रीच्या महत्त्वाच्या अटी व शर्ती: १.सदर लिलाव बोली दस्तावेजात नमूद अटी व शर्ती आणि येथे दिलेल्या प्रक्रियेनुसार घेण्यात येत आहे. बोलीदार बोली दस्तावेज, ई-लिलावात काढण्यात आलेल्या अनामत मत्तेचे तपशील आणि ऑनलाईन सादर करावयाच्या बोली प्रपत्रासाठी आमचे ई-लिलाव सेवा पुरवठादार मे. सी१ इंडिया प्रा.लि. यांच्या वेबसाईटला म्हणजे https://www.bankeauctions.com_ येथे भेट देऊ शकतात; २. सर्व इच्छुक खरेदीदार / बोलीदारांनी वर नमूद वेब पोर्टलवर म्हणजे https://www.bankeauctions.com येथे आपने नाव नोंदविणे आणि वर नमूद दिनांक व वेळी सदर ई-लिलावात सहभागी होण्यासाठी स्वतःचा युजर आयडी व पासवर्ड जनरेट करणे आवश्यक आहे; ३.ई-लिलावाबाबत चौकशी, माहिती, सहायता, प्रक्रिया व ई-लिलावाच्या ऑनलाइन प्रशिक्षणासाठी संभाव्य बोलीदार **मे. सी१ इंडिया प्रा.लि.** आमच्या ई-लिलाव सेवा भागीदाराचा विभाग, **मे. विनोद चौहान, द्वारे टेली.क्र.: +९१ ७२९११९७११२४, २५, २६, मोबाईल क्र.: ९८१३८८७९३१** आणि ई-मेल आयडी: delhi@c1india.com & support@bankeauctions.com येथे संपर्क साधू शकतात; ४.प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार सदर मालमत्तेवर कोणतेही बोजे नाहीत. परंतु, इच्छुक बोलीदार आधीच वेळ ठरवून कोणत्याही दिवशी व वेळी वर नमूद करण्यात आलेल्या मालमत्तेची व तिच्या कागदपत्रांची पाहणी करू शकतात आणि त्यांनी आपली बोली सादर करण्याअगोदर ई-लिलावात काढण्यात आलेल्या मालमत्तेच्या संदर्भात बोजे, मालकी हक्क इ. बाबत तसेच मालमत्तेवर परिणाम करू शकणारे दावे/ अधिकार / थकबाकी इ. बाबत स्वतंत्रपणे चौकशी करावी. सदर ई-लिलाव सूचना केएमबीएल कडून देण्यात येणारे वचन किंवा त्यांचे प्रतिनिधित्व नाही. सदर मालमत्तेची केएमबीएल यांना ज्ञात व अज्ञात अशा सर्व वर्तमान व भावी बोज्यासह करण्यात येत आहे. तिसऱ्या पक्षाने दावा / अधिकार/थकबाकीची मागणी केल्यास त्यासाठी प्राधिकृत अधिकारी / सुरक्षित धनको कोणत्याही प्रकारे जबाबदार नसतील; ५.ई-लिलावात सहभागी होण्यासाठी इच्छुक खरेदीदार / बोलीदारास 'कोटक महिंद्रा बँक लिमिटेड' यांचे नावे काढण्यात आलेल्या आणि नागपूर येथे देय असलेल्या अनामत मत्तेच्या व्याज-रहित बयाणा रकमेच्या भरण्याचा तपशील आणि कंपनी असल्यास वर नमूद केल्याप्रमाणे पॅन कार्ड, आधार कार्डची, निवासी पत्त्याच्या पुराव्याची, बोर्डाच्या ठरावाची आणि पत्त्याच्या पुराव्याची स्वाक्षांकित प्रत सादर / अपलोड करावी लागेल. कर्जदार / गहाणकार / जामीनदार यांना **सर्फेसी अधिनियमातील नियम ६(२), ८(६) व ९(१) अंतर्गत ३० दिवसांची वैधानिक सूचना देण्यात** येते की त्यांनी सदर सूचनेच्या दिनांकापासून ६० दिवसांचे आत अद्ययावत व्याज व खर्चासह वर नमूद थकबाकीचा भरणा करून आपल्या दायित्वाची पूर्तता करावी, अन्यथा वर नमूद अति व शर्तीनुसार अनामत मत्तेची विक्री करण्यात येईल. इंग्रजी व स्थानिक भाषेतील विक्री सूचनेच्या प्रकाशनात काही फरक असल्यास इंग्रजी वर्तमानपत्रातील सूचना स्थानिक वर्तमानपत्रातील सूचनेवर मात करत ग्राह्य धरण्यात येऊन ती अंतिम प्रत समजण्यात येईल आणि अशाप्रकारे सर्व शंका दूर करण्यात येतील. कर्जदार / जामीनदार / गहाणकाराने विक्रीच्या दिनांकाअगोदर संपूर्ण थकबाकी रकमेचा बँककडे भरणा केल्यास लिलाव थांबविण्यात येईल. विक्रीच्या अटी व शर्तीच्या तपशीलासाठी कृपया आमच्या वेबसाईटला https://www.kotak.com/en/bank-auctions.html येथे भेट द्यावी किंवा बँकेच्या वर नमूद क्षेत्रीय कार्यालयात प्राधिकृत अधिकारी **श्री रवींद्र द्विवेदी यांचेशी ९७६४४४३८१८,** ईमेल आयडी: Ravindra.dwivedi@kotak.com येथे किंवा **श्री अशोक मोटवानी यांचेशी ९८७३७३७३५१** ईमेल आयडी: ashok.motwani@kotak.com वर संपर्क साधावा. विशेष सूचना: ई-लिलाव कोटक महिंद्रा बँक लिमिटेड (केएमबीएल) यांचे वतीने आमचे सेवा पुरवठादार मे. सी१ इंडिया प्रा.लि. यांचेद्वारे आधीच विहित करण्यात आलेल्या दिनांकास राबविण्यात येईल आणि बोलीदारांनी आपल्या आवडीच्या बोली ठिकाणाहून ठिकाणाहून म्हणजे घर किंवा ऑफिसमधून किमान आरक्षित किमतीपेक्षा अधिक रकमेची बोली द्यावी. इंटरनेट जोडणी आणी इतर तत्सम बाबी यांची काळजी घेण्याची जबाबदारी बोलीदारांची स्वतःची असेल. कृपया लक्षात घ्यावे की (कोणत्याही कारणास्तव) इंटरनेट खंडित झाल्यास ती जबाबदारी संपूर्णपणे बोलीदारांची असेल आणि अशा अचानक उद्भवणाऱ्या परिस्थितीसाठी केएमबीएल किंवा सी१ इंडिया प्रा.लि. यांना जबाबदार धरता येणार नाही. अशी अप्रिय परिस्थिती टाळण्यासाठी बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी आवश्यक ती व्यवस्था / पर्यायी व्यवस्था करून ठेवावी जेणेकरून अशा परिस्थितीस बगल देत ई-लिलावात यशस्वीपणे सहभागी होता येईल. परंतु, बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी अशी गुतागुंतीची परिस्थिती टाळण्यासाठी आपली बोली देण्यासाठी / आपल्या बोलीमध्ये वाढ करण्यासाठी शेवटच्या क्षणापर्यंत वाट पाहू नये.

दिनांक : २१.०५.२०२२
ठिकाण : अमरावती

प्राधिकृत अधिकारी,
कोटक महिंद्रा बँक. लिमी.

The Akola Urban Co-operative Bank Ltd., Akola

(Multistate Scheduled Bank)
H.O.: "Jankalyan" 58/59,Toshniwal Layout,
Murtizapur Road Behind Govt. Milk Scheme,Akola-444 001

TENDER NOTICE

Bank invites sealed quotations for implementation of SDWAN Technology at our Branches. Interested vendors can visit our website www.akolaurbanbank.com for more details. The last date of submission is 30/05/2022.

Chief Executive Officer

Shiksha Mandal's
G.S. COLLEGE OF COMMERCE,

Jamnalal Bajaj Marg. Civil Lines, Wardha
(A 'Hindi' Linguistic Minority Institute)
Tel No 07152-295502 Email:gscc_wardha@rediffmail.com; Website:https://gsccwardha.ac.in/

WANTED

Shiksha Mandal provides an ethical academics focused, supportive work environment to its faculty application are invited for the following Non-Granted vacant posts from committed, self starters who enjoy teaching and research for the following positions in the non Granted (sell & finance) course of MBA and B.Com of its G.S. College of Commerce Wardha.

INVITES APPLICATION FOR FULL TIME TEACHING:

Name of the Post	No. of Posts	Nature of Post	Nature of Vacancy	Category
Associate Professor (MBA)	01	Full Time	Clear-Non Granted	Open
Assistant Professor (MBA)	03			
Assistant Professor (Commerce)	01			

The last date for submission of application is **29-05-2022.**
Details in respect of pay scale, qualification, experience etc. is available of University web portal https://www.onlinedcudrtmnu.org & College web site https://gsccwardha.ac.in/
(NOTE : Candidates are required to submit two passport size colour photographs along with application)

Shri Sanjay Bhargava
Chairman, Shiksha Mandal, Wardha

Dr. Anil Ramteke
Officiating Principal
G.S. College of Commerce, Wardha

UNIMONI FINANCIAL SERVICES LIMITED

RO: N.G. 12 & 13 Ground Floor, North Block, Manipal Centre,
Dickenson Road, Bangalore - 560 042. CIN No.U85110KA1995PLC018175

सार्वजनिक नोटिस

जनतेस हे कळविण्यात येते की युनिमनी फायनान्शियल सर्विसेस लिमिटेडद्वारा 24.05.2022 तारखेस, सकाळी 10.00 (वेळ) वाजता SHOP NO 14,GARDEN VIEW BUILDING, GOA, SOUTH GOA - 403601. (पत्ता) येथे गहाण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव आयोजित करण्यात येणार आहे. लिलाव केले जाणारे सोन्याचे दागिने जे आपल्या पैशांची बाकी भरू शकले नाहीत अशा आमच्या अनेक ग्राहकांच्या कर्जाच्या खात्यांचे आहेत. लिलावाची नोटिस कायदेशीरपणे या कर्जदारांना पाठविलेली आहे. लिलाव केले जाणारे सोन्याचे दागिने शाखेच्या नावासह खाली उल्लेख केलेल्या अनेक ग्राहकांच्या थकित कर्ज खात्याशी संबंधित आहेत.

Loan Nos: NAGPUR (NGR) - 1877281

For more details, please contact : **Mr. Naveena Shetty - 8291648221**

(Reserves the right to alter the number of accounts to be auctioned &/ postpone / cancel the auction without any prior notice.)

Shri Shivaji Education Society, Amravati's

DHANWATE NATIONAL COLLEGE

Congress Nagar, Nagpur-12.

TENDER NOTICE 2022-23

Sealed Tender / Quotation are invited for -
(1) Stationery (2) Printed Material (3) Computer and its Accessories (4) Electric Material with Fitting / Labour Charges (5) Sports Material (6) Furniture Material.

Distributor/Dealers are advised to submit their competitive offers in the format **available in the college office** at the cost of **Rs.400/-. Advertise & List of Material has published on college webiste.**

Last date of issue and submission of Tenders / Quotations is Saturday the **28/05/2022 up to 4.00 p.m.** All the right to accept and reject the offer without assigning any reason is reserved with the Principal.

Hon. Shri. Harshvardhan Deshmukh
President
Shri. Shivaji Education Society, Amravati.

Dr. J.D. Wadate
Principal
Dhanwate National College, Nagpur.